RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ६९] गुरुवार, जून ६, २०२४/ज्येष्ठ १६, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मे २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३.**

क्रमांक एडीआर-२०२४/प्र.क्र.२९/तांशि-६.— महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा.१२) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) व (२) याद्वारे प्रदान केलेल्या आणि याबाबतीत, त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ म्हणून संबोधण्यात यावयाचे एक मंडळ स्थापन करीत आहे.

२. मंडळात, पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

**क. पदसिद्ध सदस्य**

| अ. क्र. (१) | पदाचे नाव (२) | (३) |
|---|---|---|
| (क) | संचालक, कला संचालनालय, | अध्यक्ष ; |
| (ख) | विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले, सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले, | पदसिध्द सदस्य ; |
| (ग) | शासनाचे सहसचिव किंवा उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले, | पदसिध्द सदस्य ; |

| अ. क्र. (१) | पदाचे नाव (२) | (३) |
|---|---|---|
| (घ) | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले, विभागीय मंडळाच्या अध्यक्षाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले, | पदसिध्द सदस्य ; |
| (ड) | संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, | पदसिध्द सदस्य ; |
| (च) | सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, | सदस्य सचिव. |

**ख. नामनिर्देशित सदस्य**

| अ.क्र. (१) | व्यक्तीचे नाव (२) | (३) |
|---|---|---|
| (क) | श्री. विश्वनाथ साबळे, अधिष्ठाता, सर जे.जे. कला महाविद्यालय, मुंबई | सदस्य. |

**टीप.—** (१) नामनिर्देशित केलेले सदस्य त्यांची नावे ज्या दिनांकास **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करण्यात येतील त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करतील.

(२) मावळत्या सदस्यांचा पदावधी, ज्या दिनांकास, त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची नावे **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करण्यात येतील त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत वाढविण्यात येईल आणि समाप्त होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 29th May 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE BOARD OF ART EDUCATION ACT, 2023.

No. ADR-2024/C.R.29/TE-6.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section 5 of the Maharashtra State Board of Art Education Act, 2023 (Mah.XII of 2024), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby establishes a Board to be called as the Maharashtra State Board of Art Education for the purposes of the said Act.

2. The Board shall consist of the following members, namely :—

**A. *Ex-officio* Members**

| Sr. No. (1) | Name of the Post (2) | (3) |
|---|---|---|
| *(a)* | Director, Directorate of Art, | Chairperson; |
| *(b)* | Development Commissioner (Industries), Directorate of Industries or his nominee, not below the rank of Joint Director, | *ex-officio* Member ; |
| *(c)* | Joint Secretary or Deputy Secretary to Government, Higher and Technical Education Department or his nominee, | *ex-officio* Member ; |
| *(d)* | Chairman of the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or his nominee, not below the rank of the Chairman of the Divisional Board, | *ex-officio* Member ; |
| *(e)* | Director, Maharashtra State Board of Art Education, | *ex-officio* Member ; |
| *(f)* | Secretary, Maharashtra State Board of Art Education, | Member Secretary. |

**B. Nominated Members**

| Sr. No. (1) | Name of the Person (2) | (3) |
|---|---|---|
| *(a)* | Shri Vishwanath Sable, Dean, Sir J. J. School of Art, Mumbai, | Member. |

*Note.*— (1) The Nominated members shall hold office for a term of three years from the date on which his name is published in the *Official Gazette.*

(2) The term of office of the outgoing members shall extend to, and expire with, the day immediately preceding the date on which the names of their successors are published in the *Official Gazette.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Principal Secretary to the Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.